# प्रभु तरुण

| वर्ष ५६ | अंक १२ | मुंबई | १६ ऑगस्ट, २०२३ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

( *स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

www.prabhutarun.org

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## प्रिय वाचकहो,

—सुहासिनी कीर्तिकर

प्रिय वाचकहो, स.न.वि.वि. तुम्ही फक्त वाचकच नव्हेत हं; आमच्यासाठी. तुम्ही प्रभुतरुण परिवारातले आहात आणि हा परिवार फार फार मोठ्ठा आहे. शिवाय अनेक वर्षांचा. अहो; चक्क शंभर वर्षांचा आपला स्नेहबंध आहे. म्हणूनच त्याच परिवारातील एक मी; या भावनेने आपल्याला या संपादकीयात निर्मळ, उत्कट साद घातली आहे. खरं तर; आजकाल कुणी कुणाला काही सांगायचे असेल तर पत्र लिहायचा खटाटोप करीत नाही. अहो; आज डिजीटल युग आहे. यंत्रणा अद्ययावत आहे. टेलिफोन, पोस्ट इ. पूर्वी खूप जवळच्या असणाऱ्या यंत्रणा पाऽऽर मोडीत निघाल्यासारख्या झाल्या आहेत. शिवाय त्यात श्रुतिसुख होते; पण नेत्रसुख नव्हते जे आज आहे. आज बटने दाबली, व्हिडियो लावला, आवाज मुद्रित केला की पटकन साधतो संवाद. निकट असल्याची संवादी जाणीव फुलून येते त्यात. तरीही पत्र लिहिणे यासारखा आनंद नाही आजही. 'प्रभुतरुण' या मासिकपत्रातून मी तुमच्याशी संवाद साधून असाच आनंद घेते ना? म्हणूनच जुने तेच सोने नसले तरी जुने सोनेही असते बरं का! म्हणून तर आज प्रभुतरुणाने शंभरी गाठली तरीही तुमच्याशी संवाद चालूच आहे. नुसता चालू नाही. त्यात आदानप्रदान आहे. तुमचा क्रियाशील सहभाग आहे. दरवर्षी नवनवी तीन चार सदरे यात येतात आणि आपला मैत्रभाव गडद होतो. तुम्ही आवर्जून पसंतीची दाद देता; आपला रसिकभाव सुंदर होतो. तुम्ही आपलेपणाने स्वत:च्या अगर परिवारातील कुणाच्या बातम्या देता. आपला कुटुंबभाव अधिक घट्ट होतो. एखादी बातमी तरुणात नाही आली अनवधानाने समजा; तर तुम्ही आवर्जून सांगता की 'ही बातमी येऊ द्या पुढील अंकात.' म्हणजे 'प्रभुतरुण' ही जणू खातेवहीच आहे; तेथे नोंद होणे गरजेचे वाटते नं तुम्हाला? पूर्वी आपली ज्ञात काही ठिकाणी एकवटलेली होती. घरोघरी बातमी सहज देता येई. कुणी परीक्षा 'पसार' (पास) झाला तर पेढे प्रत्येक घरी दिले जात. आज याच आपल्या ज्ञातीचे 'विश्वची माझे घर' झालेय. अशावेळी ज्ञातीमासिके हा मोठ्ठा दुवा. 'प्रभुतरुण' तुम्हाला असा दुवा वाटतोय. तुमच्या घरचा सोबती वाटतोय. कै. विष्णूपंत कोठारे, कै. सुहास कोठारे, कै. विहंग नायक यांनी प्रभुतरुणातून जाणीवपूर्वक तुमच्याशी घरोबा जोडला. आता कार्यकारी संपादक सोबतीला घेऊन मीदेखील तेच करते आहे. अगदी करोनाकाळातही पीडीएफ पर्याय देऊन मी अंकात खंड पडू दिला नाही. माझ्या संपादकीय कारकीर्दीत पहिली दहा वर्षे प्रदीप कोठारेंची 'हास्यरेखा' येत होती. का? तर तुम्हाला विरंगुळा म्हणून. नवनवीन विषय, नवनवीन चारपाच सदरे, तरुणाईचा सहभाग... हे सारे मी तुमच्यावरील प्रेमामुळेच केले. आता तर संजनाने सहकाऱ्यांच्या बळावर 'प्रभुतरुण बुलेटिन' ही यशस्वी केलेय. एक पाऊल तुमच्याबरोबर; पण काळाच्या पुढेच सतत टाकत आलाय तुमचा 'प्रभुतरुण'. मला खात्रीच आहे की प्रभुतरुण मोठ्ठा करण्यात तुमची मैत्री हातभार लावत आहे.

हे पत्र तुम्हाला लिहून प्रभुतरुणाच्या शतकोत्तरी वाटचालीत त्याच्या बदलत्या रूपाला साथ देण्याची विनंती इथे करीत आहे ती याच भरवशावर. या वर्षात हळूहळू प्रभुतरुण कात टाकून आपले लिखीत रूप संपवेल आणि यंत्रसमृद्ध असा डिजीटल स्वरूपात भेटीस येत जाईल. त्याकरिता एक विनंती की बातम्या पाठवताना आता फोटोही पाठवत जा. काही महत्त्वाचा मजकूर पाठविलात तर जरूर नोंद घेतली जाईल. याच महिन्यात तर 'प्रभुतरुणा'चा वाढदिवस आहे. शुभेच्छा आहेतच तुमच्या. पत्रही पाठवीत रहा. लोभ आहेच; वाढावा. पत्रलेखनात जादू असते नं? गंमत म्हणून काही पत्रांचे (साहित्यिक) संदर्भ देते इथे. माधव ज्युलियनांनी 'शिवाजीचे बेगमेस पत्र' नावाची कविता लिहिली आहे. शिवाजीला औरंगजेबाच्या बेगमेने चिकाच्या पडद्याआडून पाहिले अन् तिने फारसी भाषेतून त्यांना पत्र लिहिले खूष होऊन; अशी कल्पना करून कवीने ही कविता लिहिलीय. शिवाजी या पत्रात म्हणतात की हे पत्र वाचण्यासाठी 'फारसी मराठी शब्दकोश पाठवावा.'!! ही पत्रगंमत. सुनीताबाई तर 'पु लं' ना कोरे पत्र पाठवून त्यात एकच वाक्य लिहीत - 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन'. शकुंतलेने बिसतंतूने पत्र लिहीले, गंधर्वाने मेघालाच दूत बनवले. देशभक्तांनी रक्ताने पत्रे लिहिली. इंदिरा संतांचे पत्र तर एक अप्रतिम कविताच. त्यात त्या लिहितात -;

'पत्र लिही पण नको पाठवू
शाईमधुनी काजळ गहिरे
लिपि रेषांच्या जाळीमधुनि
नको पाठवू हसू लाजरे
नको पाठवू तीळ गालीचा
पूर्ण विरामाच्या बिंदूतून....' असे

बरेच काही. शेवटी त्या म्हणतात,

'पाठविशी ते सगळे सगळे
पहिल्या ओळीमध्येच मिळते
पत्र त्यानंतरचे मग
वाचावयाचे राहून जाते.'.. तर

अशी पत्रे!

'प्रभुतरुण' हे मासिकपत्र वाचावयाचे राहून नाही जाणार. कारण त्यावर तुमचा लोभ आहे. तो वाढत राहो... या भावनेतून तुम्हाला हे पत्र...

तुमचीच,
सुहासिनी कीर्तिकर

## आदरांजली

-सुहासिनी कीर्तिकर



**श्रीमती सुहासिनी कोठारे**

प्रभुतरुणाचे संस्थापक, संपादक कै. विष्णूपंत कोठारे यांच्या स्नुषा आणि संपादक कै. सुहास कोठारे यांच्या अर्धांगिनी श्रीमती सुहासिनी यांचे २३ जुलैला दु:खद निधन झाले. त्या तनमनाने प्रभुतरुणाशी एकरूप झाल्या होत्या. प्रभुतरुणाच्या सुरुवातीच्या कालखंडात सर्व अंक घरात आल्यावर त्यांच्या घड्या घालण्याचे यांत्रिक काम त्या सुहासना साथ देत करीत असत. हे प्रभुतरुणाचे संगोपन होते. सुहास यांच्या निधनानंतरही त्यांचे निवासस्थान हीच प्रभुतरुणाची अधिकृत कचेरी राहिली ती याच योगदानामुळे. कारण त्यांचे अख्खे कुटुंबच प्रभुतरुणमय आहे. त्यांचे चिरंजीव श्री. दीपक हे विश्वस्त; तर सूनबाई सौ. संजना प्रभुतरुणाच्या कार्यकारी संपादक आणि आता प्रभुतरुणबुलेटिनप्रमुख. सुहासिनीताई मला म्हणत, ''कुणी प्रभुतरुणाला नाव ठेवले तर माझ्या दीपकला नाव ठेवल्याइतकेच मला वाईट वाटते.'' खरंच; प्रभुतरुण त्यांचे मानसिक अपत्यच होते. माझ्या संपादकीयावर त्या फोन करून न चुकता आस्वादक प्रतिक्रिया देत. माझे आप्तजन काळाने हिरावून नेले त्यात्यावेळी त्यांनी फोनवर माझे सांत्वन केले. पुस्तकवाचनाचा त्यांना छंद होता. त्याविषयी काही शंका असली तर त्या माझ्याशी बोलत.

(पान २ कॉलम १ वर)

# श्रावणमासी हर्ष मानसी

संकलन व लेखन : **संजय शरद दळवी**

श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे

क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी उन पडे

वरती बघता इंद्रधनुचा गोफ दुहेरी विणलासे

मंगल तोरण काय बांधले नभोमंडपी कुणी भासे

श्रावण महिन्यात सर्वत्र हिरवळ पसरते. क्षणात पाऊस पडतो, तर दुसऱ्या क्षणाला ऊन पडते. ऊन-पावसाचा हा लपंडाव पाहून मन आनंदाने फुलून येते. वर आकाशात इंद्रधनुष्याचा दुपेडी गोफ विणलेला दिसतो. इंद्रधनुष्य उमटलेले पाहून असे वाटते की, कुणीतरी आकाशाच्या मंडपाला पवित्र तोरण बांधले आहे.

**महत्त्वाचे दिवसः**
कृष्णजन्माष्टमी; नारळीपौर्णिमा; रक्षाबंधन; नागपंचमी; पोळा; हरियालीतीज; पिठोरी अमावस्या
**कॅलेंडर** : हिंदू कॅलेंडर
**ग्रेगोरियन समतुल्य**: जुलै-ऑगस्ट
**हंगाम**: पावसाळी

हिंदू कॅलेंडरनुसार, श्रावण हा पाचवा महिना आहे जो जुलै ते ऑगस्ट दरम्यान येतो. तामिळ कॅलेंडरमध्ये तो अवनी म्हणून ओळखला जातो आणि सौरवर्षाचा पाचवाच महिना असतो. असे मानले जाते की पौर्णिमेच्या दिवशी किंवा या महिन्यात कोणत्याही वेळी, श्रावण नक्षत्र किंवा तारा आकाशावर राज्य करतात आणि म्हणूनच या नक्षत्रावरून या महिन्याचे नाव पडले आहे. श्रावण महिना हा शुभ सण आणि सर्व महत्त्वाचे धार्मिक समारंभ आयोजित करण्यासाठी सुयोग्य मानला जातो, कारण या महिन्यातील जवळजवळ सर्वच दिवस शुभआरंभासाठी म्हणजे चांगली सुरुवात होण्यासाठी शुभ असतात. श्रावणाची अधिपती देवता भगवान शिव आहे.

हिंदू पौराणिक कथांनुसार, भगवान शिवाने समुद्रमंथनाच्यावेळी समुद्रातून बाहेर पडलेले विष प्राशन केले आणि जगाचे रक्षण केले. म्हणून त्याचे भक्त सावन किंवा श्रावण महिन्यात परमेश्वराची प्रार्थना करतात, की त्याने आपल्या अनुयायांचे सर्व धोक्यांपासून रक्षण करावे आणि त्यांना चांगले आरोग्य आणि भाग्य द्यावे.

पुराणानुसार समुद्रमंथन हे अत्यंत महत्त्वाचे पर्व आहे. दुधाळ महासागराचे मंथन, म्हणजेच समुद्रातील समुद्रमंथन, जे देव व दानवांनी अमृत शोधण्यासाठी केले होते. मंथनादरम्यान, सागरामधून १४ भिन्न रत्ने बाहेर आली, ज्यातील १३ रत्ने देव व दानवांनी वाटून घेतली परंतु चौदावे रत्न, हलाहल मात्र अस्पर्शित राहिले. कारण ते साऱ्या विश्वाचा नाश करण्याइतके भयंकर असे विष होते. भगवान शिवाने ते हलाहल प्राशन केले आणि विष आपल्या कंठात साठवले. विषाच्या प्रभावामुळे त्याचा घसा निळा झाला आणि त्याला नीलकंठ असे नाव पडले. भगवान शिवाने धारण केलेल्या विषाचा असा प्रभाव होता की त्याने डोक्यावर चंद्रकोर धारण केली आणि सर्व देवांनी पवित्र गंगाजलाने त्याचा अभिषेक सुरू केला. हे सर्व श्रावणमासात घडले म्हणून श्रावणात पवित्र गंगाजल शिवाला अर्पण करणे अत्यंत शुभ मानले जाते.

महिन्यातला प्रत्येक सोमवार सर्व मंदिरांमध्ये श्रावण सोमवार म्हणून साजरा केला जातो, ज्यामध्ये शिवलिंगावर धरणात्र टांगले जाते. दिवसभर, सकाळपासून ते रात्रीपर्यंत पवित्र पाण्याने आणि दुधाने शिवपिंडीला अभिषेक केला जातो. भक्त उपवास करून आणि शांतीपूर्ण आणि समृद्ध जीवनासाठी भगवान शिव आणि देवी पार्वतीची प्रार्थना करून हा विशेष प्रसंग साजरा करतात. ते यात्रेला जातात, पवित्र नद्यांमधून पाणी आणतात आणि त्यांच्याजवळच्या मंदिरातील शिवलिंगाला अर्पण करण्यासाठी हंड्यातून पाणी खांद्यावर घेऊन जातात. दरवर्षी लाखो भाविक निष्ठेनेही यात्रा करतात. या व्यतिरिक्त, असेही म्हटले जाते की भगवान शिवाला अर्पण करेपर्यंत हे पवित्र पाणी जमिनीवर किंवा कोणत्याही पृष्ठभागावर ठेवू नये. भक्त प्रत्येक श्रावण सोमवारी भगवान शिवाला बेलाची पाने, फुले, पवित्र पाणी आणि दूध, म्हणजे फलम्-तोयम्, पुष्पम्-पात्रम् अर्पण करतात. सूर्यास्त होईपर्यंत उपवास करतात आणि नंदादीप, अखंडदीप, सतत तेवत ठेवतात.

वैदिक ग्रंथांनुसार, रुद्राभिषेक, म्हणजेच शिवाची रुद्र किंवा क्रोधीरूपात पूजा करणे, ही सर्व काळातील सर्व श्रेष्ठ पूजा मानली जाते. रुद्राभिषेक श्रावणमासात आशीर्वाद मिळविण्यासाठी आणि भगवान शिवावरची भक्ती व्यक्त करण्यासाठी केला जातो. श्रावणमासात केलेला रुद्राभिषेक अधिक शुभ मानला जातो.

**कृष्णजन्माष्टमी**

कृष्णजन्माष्टमी, जी फक्त कृष्णाष्टमी, जन्माष्टमी किंवा गोकुळाष्टमी म्हणून ओळखली जाते, हा वार्षिक हिंदूसण आहे, जो विष्णूचा आठवा अवतार मानलेल्या कृष्णाच्या जन्माबद्दल साजरा केला जातो. गीत गोविंदासारख्या काही हिंदूग्रंथांमध्ये, कृष्णाला सर्वोच्च देव आणि सर्व अवतारांचा स्रोत म्हणून ओळखले गेले आहे.

ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात अष्टमीच्या रात्री मथुरेत भगवान श्रीकृष्णाचा जन्म झाला, अशी आख्यायिका या उत्सवाभोवती आहे. त्याचा जन्म मथुरातुरुंगात झाला कारण त्याचा मामा राजा कंस याने त्याचे आई-वडील, देवकी आणि वासुदेव, यांना कैद केले होते. या जोडप्याचा आठवा मुलगा त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरेल अशी आकाशवाणी झाल्यामुळे त्याने हे केले. पण कृष्णाचा जन्म झाल्यावर वासुदेव तुरुंगातून पळून जाण्यात यशस्वी झाला. त्याने वृंदावनात जाऊन आपले मूल यशोदा व नंद यांच्या स्वाधीन केले, जेथे कृष्ण वाढला.

लहानपणी कृष्णाला लोणी खायला खूप आवडायचे आणि वृंदावनातील स्त्रिया लोण्याची भांडी त्याच्याकडून लोणी चोरीला जाऊ नयेत म्हणून उंचावर बांधत असत. परंतु यामुळे कृष्णाच्या पुढाकारा-खालील मुले माखन चोरीपासून परावृत्त नाही झाली. कृष्ण त्याच्या मित्रांना घेऊन उंचावर टांगलेल्या भांड्यांपर्यंत पोचण्यासाठी आणि लोणी चोरण्यासाठी मानवी पिरॅमिड बनवत असे. यातूनच सध्याच्या दहीहंडी उत्सवाला प्रेरणा मिळालेली दिसून येते, आणि हा उत्सवाचा एक महत्त्वाचा पैलू आहे.

महाराष्ट्रात दहीहंडी उत्सव हा जन्माष्टमी उत्सवाचा एक आवश्यक भाग आहे. वृंदावन आणि मथुरेसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी तो मोठ्या उत्साहाने पाळला जातो. हा सण साजरा करण्यासाठी अनेक पदार्थ आणि मिठाईदेखील तयार केल्या जातात. ह्यात खव्याचा प्रसाद मुख्य असतो. कृष्णजन्मोत्सव साजरा करण्यासाठी कृष्णभक्त उपवास ठेवतात, कीर्तन करतात आणि कृष्णपूजा बांधतात. बाळकृष्णाची मूर्ती, लाडू गोपाळ एका लहान खाटेवर ठेवली जाते आणि घरांमध्ये कृष्णाच्या जन्माचे प्रतीक म्हणून वापरली जाते. भगवान श्रीकृष्णाचा जन्म मध्यरात्री झाला असल्याने त्यांची जयंती, जन्माष्टमी, दोन दिवस साजरी केली जाते. जे लोक उपवास करतात ते रात्री भगवान श्रीकृष्णाच्या जयंती उत्सवानंतरच उपवास सोडतात. पुष्कळ लोकांचा असा विश्वास आहे की कृष्ण मध्यरात्री त्याच्या भक्तांच्या घरी प्रसाद घेण्यासाठी येतो. इंग्रजी दिनदर्शिकेनुसार जन्माष्टमीची निश्चित तारीख नसते. जन्माष्टमीच्या रात्री नृत्य-नाटक, पूजा करून, रात्रीचे जागरण करून पत्ते खेळले जातात.

**नारळी पौर्णिमा**

श्रावण महिन्याला सण, धार्मिक उत्सव व व्रतांचा महिनाच म्हटले जाते. या महिन्यात येणाऱ्या सण, धार्मिक उत्सव व व्रतांमध्ये नारळी पौर्णिमा हा एक सण साजरा केला जातो. रक्षाबंधनालाच नारळी पौर्णिमा सण साजरा केला जातो. श्रावण पौर्णिमेला कोळी बांधव नारळी पौर्णिमा असे म्हणतात. समुद्र हे वरूण देवाचे स्थान समजले जाते. वरूण देव हा पश्चिम दिशेचा रक्षक आहे त्याला या नारळीपौर्णिमेच्या दिवशी नारळ अर्पण करून त्याच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली जाते.

कोळीबांधवांचे संपूर्ण जीवन सागराशी एकरूप झालेले असते. त्यामुळे सागराची आपल्यावर कायम कृपा राहावी याकरिता त्याची प्रार्थना करून त्याचे उतराई होण्याच्या हेतूने नारळी पौर्णिमेचा हा उत्सव मोठ्या उल्हासाने कोळीबांधव साजरा करतांना दिसतात.

नारळी पौर्णिमेच्या बऱ्याच अगोदर कोळी बांधवांनी समुद्रात जाणे थांबवलेले असते. एकतर तो काळ माश्यांच्या प्रजननाचा काळ समजला जातो आणि दुसरे म्हणजे पावसाळा असल्याने समुद्र खवळलेला असतो. त्यामुळे कोळीबांधव त्या दरम्यान समुद्रात जात नाहीत. यादिवशी कोळी बांधव व समुद्रकिनारी रहाणारे लोक वरुण देवतेप्रीत्यर्थ समुद्राची पूजा करून त्याला नारळ अर्पण करतात. यादिवशी अर्पण करावयाचे नारळ हे फळ शुभसूचक आहे, तसेच ते सर्जनशक्तीचेही प्रतीक मानले जाते.

नारळी पौर्णिमेच्या निमित्ताने बनवलेल्या खास नारळाच्या करंजांचा नैवेद्य सागराला आणि बोटीला दाखवण्यात येतो. अनेक कोळीपाड्यांवर रावस माश्याचा

(पान ५ कॉलम १ वर)

---

(पान १ कॉलम ४ वरून)

आम्ही काहीजणी एकत्र सहलीला जात असू. तर कुणाकुणाची आवड लक्षात ठेवून त्या अप्पे, रोठ स्वत: करून प्रेमाने घेऊन येत असत. आम्ही पाच मैत्रिणी समवयस्क होतो. त्यामुळे सगळ्याजणी एखाद्या ठिकाणी जमून तो एकत्रित साजराही करत असू. अशा त्या कुटुंबभावना जपणाऱ्या होत्या. प्रभुतरुणाच्या वर्धापनदिनी त्या देणगी देत ती आपल्या नातवंडांच्या नावाने.

त्यांच्या निधनाने प्रभुतरुण परिवारातील एक कुटुंबीय हरवला आहे. अवघा प्रभुतरुण परिवार श्री. दिपक, सौ. संजन आणि त्यांची मुले यांच्या दु:खात सहभागी आहे. शांतीरस्तु!

'हर्ष'

# कस्तुरी सुगंध

-हेमंत विनायकराव तळपदे

माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. एखाद्या माणसाला एका निर्जन बेटावर एकटे ठेवले आणि त्याची खाण्यापिण्याची व्यवस्थाही केली तरी तो त्या बेटावर एकाकीपणे जगणे कठीण आहे. कारण प्रत्येक माणसाला सहवास प्रिय असतो. या मुंबई बेटावर (साष्टी) फार पूर्वीपासून कोळी, भंडारी, पारशी तसेच पाठारे प्रभु समाज स्थिरावला होता. पाठारे प्रभूंची संख्या कमी असली तरी शैक्षणिकदृष्ट्या आपण फार पूर्वीपासून प्रगतच होतो. आपल्या समाजात आजही डॉक्टर, वकील, प्राध्यापक अशी अनेक क्षेत्रात पारंगत माणसे आजही भरपूर सापडतील. पण १०० वर्षांपूर्वी या समाजाला वैचारिक दृष्टीने एकत्र आणणे जरुरीचे होते. आणि हेच महान कार्य त्याकाळी श्री. विष्णुपंत कोठारेंनी २५ ऑगस्ट १९२३ रोजी 'प्रभुतरुण' या ज्ञातीय पत्रिकेच्या मुहूर्तमेढीने केले.

आता प्रश्न असा पडतो की या पुस्तिकेचे नाव 'प्रभुतरुण'च का? माझ्या मते प्रभुतरुणकारांना प्रभुज्ञाती केवळ विद्याप्रचुरच नाही पण ती मनानेही तरुण आहे याचा प्रत्यय चांगलाच असावा.

या 'प्रभुतरुण' पत्रिकेने काय मिळवले? असा प्रश्न आजही काहीजणांना पडत असेल. पण प्रभुतरुणाचा एक प्रामाणिक वाचक म्हणून मला जर कोणी विचारले तर मी खरंच सांगेन की हा 'प्रभुतरुण' आज १०० वर्षे पूर्ण करताना आजही आपल्यासारख्या वाचकांना हवाहवासा वाटतो. दर महिन्याला १६ तारखेला पोस्टात सर्व अंक पाठवताना हे काम वरवर सोपे वाटले तरी खरोखरच याचे सातत्य फारच कठीण आहे. आजच्या काळात सहज नजर फिरवली तर आपल्या लक्षात येईल की अनेक मासिके, पाक्षिके, ज्ञातीयपत्रिका काळाच्या ओघात बंद पडतात. काहींना तर १ वर्षही आयुष्य लाभत नाही. तर काही थोडी वर्षे तग धरतात व नंतर 'हे राम' म्हणतात. पण आपला 'प्रभु तरुण' आज १०० वर्षे पूर्ण करताना तितक्याच दिमाखात उभा आहे हे मान्यच करावे लागेल.

खरे पाहता यामागे अनेकांची सतत धडपड आहे. श्री. विष्णुपंत कोठारेंनी समाजसेवेचा वसाच घेतला होता. ते कोणी धनाढ्य इसम नव्हते किंवा त्यांना एखाद्या भांडवलदारा-कडून पैशाची रसद पुरवली जात नव्हती; पण 'एकला चलो रे' या उक्तीप्रमाणे त्यांनी प्रभुतरुणाचा श्रीगणेशा केला. या कार्यात सहयोग करण्यास अनेक ज्ञातीबांधव पुढे आले. कोणी आर्थिक बाबी सांभाळल्या. तर अनेकांनी वैचारिक लेखनही केले. स्वत: विष्णुपंत कोठारेंचा मराठी भाषेवरील प्रभुत्वाचा प्रत्यय त्यांच्या अनेक स्तंभामधून येत असे. आता आपला प्रभुतरुण १०० वर्षांचा झाला म्हणून समारंभ साजरा करताना आपल्याला खरोखरच या आद्य संपादकासमोर नतमस्तक व्हावे लागेल.

यानंतर या प्रभुतरुणाची धुरा श्री विष्णुपंतांचे चिरंजीव श्री. सुहास कोठारेंनी सांभाळली. त्यांचा कालखंडही तितकाच प्रगल्भ होता. फरक इतकाच की विष्णुपंतांची लेखणी कधीकधी एखाद्या वैचारिक मतभेदांवर दाहक होत असे. तर सुहास कोठारेंनी तितकी टोकाची भूमिका केव्हाही घेतली नाही. तर जमेल तितके सर्वांना सांभाळून घेतले. आजही समाजाच्या वार्षिक कार्यक्रमात त्यांनी केलेली भाषणे मला आठवतात. तो सौम्य स्वर; पण त्याचबरोबर एखाद्याची चूक दाखवताना त्यावर केलेली मिस्किल टिप्पणी जाणत्या श्रोत्यांची दाद मिळवत असे. एक विशेष म्हणजे सुहास कोठारेंना शास्त्रीय संगीत आणि भावगीतांची विशेष आवड होती. हा उमदा, हळवा संपादक प्रभुतरुणाची सेवा त्यामानाने जास्त काळ करू शकला नाही याचा आजही खेद वाटतो.

त्यानंतर प्रभु तरुणाचे संपादकत्व श्री. विहंग नायक यांनी स्वीकारले. श्री विहंग नायक एक हरहुन्नरी व्यक्तिमत्व. स्वत: उच्च शिक्षित पण लहानपणापासून नाट्यक्षेत्राची विलक्षण आवड. त्यांनी प्रभुतरुणाचा भार सांभाळतांना स्वत: नोकरी सांभाळून नाट्य, सिनेमा अशा विविध क्षेत्रात भरारी मारली. त्यांच्या विनोदी भूमिका तर लाजवाब होत्याच; पण काही भूमिकात त्यांनी संयमी अभिनयाचा कस लावला. या प्रभुतरुणाचा डोलारा आज इतक्या रुबाबात दिसतो त्याच्या पायाचे दगड भक्कम करण्याचे काम श्री सुहास कोठारे व श्री विहंग नायक या मित्रद्वयांनी खरोखरच परिपूर्ण केले.

आता प्रभुतरुणाची धुरा आपल्या विदुषी प्राध्यापिका श्रीमती सुहासिनी कीर्तिकर सांभाळत आहेत. त्यांच्या मराठी भाषेवरील प्रभुत्वाचा प्रत्यय प्रत्येक लेखात आवर्जून आढळतो. आमच्यासारख्या मराठी भाषेवरील प्रेमिकांना तर त्यांचे संपादकीय वाचणे एक पर्वणीच असते. आजही

(पान ४ कॉलम ३ वर)

काही नवे - काही जुने

# काय गंमत आहे!

-नंदकुमार विजयकर

काय गंमत आहे पहा. आपण आपल्या घरातून बाहेर पडतो. रस्त्याला लागतो. एक-दोन पावलं जातो ना जातो तोच एक मांजर आडव जातं. मग आपली पावलं थबकतात. मनात हटकून विचार येतो, चला आज काही आपलं काम होत नाही. शकून-अपशकूनावर आपला विश्वास आहे. पण काही लोक यावर विश्वास ठेवत नाहीत. 'हे सर्व थोतांड आहे, अंधश्रद्धा आहे' हे पटवण्यासाठी लोकांचे बौद्धिक घेत असतात. पण गंमत म्हणजे ह्या लोकांनाही जेव्हा मांजर आडवं जातं तेंव्हा यांची पावलं आपल्यासारखीच अडखळतात. कधीतर फारच गंमत होते. म्हणजे आपण पाहतो, एखादं मांजर, आपल्याला आडवं जाण्याच्या बेतात आहे. मग आपण काय करतो? आपण आपली चाल बदलतो. म्हणजे आपण झपझप पावलं टकतो, दिशा बदलतो. थोडक्यात ते मांजर आपल्याला आडवं जाण्याऐवजी त्या मांजाराला आडवं जाण्याच्या प्रयत्नात असतो. पण गंमत अशी की या मांजरी एवढ्या चपळ असतात की, त्या शेवटी आडव्या जातातच. कदाचित ह्या मांजरींना माणूस आडवा गेलेला खपत नसेल. तुम्ही कधी पाहिलंय? म्हणजे तुम्ही रस्त्याने चालतात आणि तुम्हाला समांतर अगदी सावकाशीत मांजरी चालल्यात? यांना रस्ता काटल्याशिवाय चैनच पडत नाही. कुत्र्याचं तसं नाही. एक तर ती तोंडावर भुंकतील किंवा आपल्या मागून पायात घुटमळत येतील. कावळ्यासारखा लोफर प्राणी... क्षमा करा पक्षी शोधून सापडणार नाही. गॅलरीत उभं राहिलं की, हे कावळे महाराज गॅलरीच्या दुसऱ्या टोकाला येऊन बसणार आपलं लक्ष नाही हे बघून हळूहळू दोन पायांवर उड्या मारत आपल्या बाजूला सरकणार. 'शू... हड्... टाळी' एवढ्या प्रकारांनी उडवायचा प्रयत्न केला तरी, हे महाशय परत दुसऱ्या टोकाला जाणार, पण उडायचं नाव नाही.

आणि आता या चिमण्या, या... काय गंमत आहे, मी काय चिऊ-काऊच्या गोष्टी सांगत बसलोय! आपण थोडं माणसात येऊ. अहो माणूस नावाचा प्राणी काय गंमतीचा आहे? पण एक गोष्ट मात्र खरी. हे चिऊ, काऊ, माऊ ही मंडळी आपली चाल कधीही बदलणार नाहीत. पण हा माणूसप्राणी संधी साधून आपली चाल कधी बदलेल ते सांगता येणार नाही. काय गंमत आहे, आता तर मी तुम्हाला चक्क एक सुभाषित सांगत बसलोय! अहो हातची गंमत सोडून एवढ्या गंभीर तत्त्वज्ञानामागे कशाला पळा? परवाच मी पुण्याच्या कर्वे रोडवर फिरत होतो. अचानक माझी नजर एका पाटीकडे गेली. 'आम्ही हे करतो' त्याखाली एक आडवा बाण आणि पुढे 'मागच्या बाजूला संपर्क साधा' आता हे लोक मागच्या बाजूला काय करतात; हेच कळेना. मी विचार करत होतो; इतक्यात माझं लक्ष वरच्या चित्राकडे गेलं. सौर ऊर्जेवर चालणाऱ्या एका बंबाचं भलमोठं 'कटआऊट' होतं. म्हणजे हे लोक 'सोलर वॉटर हीटर' बनवण्याचं काम करत होते.

अशी गंमत पाहायची असेल तर या पुण्यनगरीत फेरफटका मारायला हवा. गेली दोन वर्षे माझं पुण्यात वास्तव्य आहे आणि असल्या गंमतीजंमती इथे भरपूर आहेत. पुणेकरांना त्याचा सार्थ अभिमान आहे. 'पुणे तेथे काय उणे?' येथे उणे काही नाही. आहे ते सर्व अधिक. येथे रस्त्यांपेक्षा बोळ अधिक. बोळांपेक्षा चौक अधिक. चौकाचौकात सिग्नल अधिक. रहदारी अधिक, त्यात बेशिस्त अधिक. अलीकडेच मी व ब्रह्मांडकर पौड रोडवर फिरत होतो. ब्रह्मांडकरांचं लक्ष तिथल्या एका हॉटेलकडे गेलं. त्याच नाव होतं 'आई ग!' म्हणजे एखादी चटकदार भेळ किंवा खमंग मिसळ खाल्ल्यावर आपण ओरडतो ना, 'आई गं, काय मस्त आहे!' तस्स. त्यांना ते नाव फारच आवडलं, म्हणाले, ''चला हॉटेलमध्ये जाऊ.'' मी म्हटलं, ''थांबा, त्या नावावर जाऊ नका. तिथले पदार्थ खाल्ल्यावर आणि मागून येणारं बिल पाहिल्यावर 'बापरे!' म्हणायची पाळी आली नाही म्हणजे मिळवली.''

काय गंमत आहे पहा, कालच आमच्या कॉलनीतल्या किराणा मालाच्या दुकानात गेलो होतो. इथल्या भाषेत 'सुपर मार्केट'. कितीही लहान दुकान असलं तरी ते 'सुपर शॉपी' असतं. तिथल्या माणसाला सहज गंमतीने विचारलं, ''काय रे, इतर सर्वजण गणपती, दिवाळीसारख्या सणाला छोटे-मोठे सेल लावतात. उलट सणासुदीला तुमचे भाव कडाडतात.-'' त्यावर तो माणूस समजावणीच्या सुरात मला सांगू लागला, ''साहेब, त्याचं असं आहे ना, हे लोक माल उरला, जुना झाला किंवा कपडे फॅशनमधून गेले की, सेल लावतात.'' मग मी म्हणालो, ''काय रे, मग तुम्ही जुना तांदुळ कमी किंमतीत का विकत नाही?'' आणि गंमत म्हणजे बराच वेळ तो माझ्याकडे आ वासून पाहतच बसला.

मित्रहो, काय गंमत आहे! या गंमती जंमतीच्या गोष्टी गंमतीजंमतीनं सांगितल्या. त्या फारशा मनावर न घेता गंमतीगंमतीनं घ्यायच्या. तेवढीच आपली गंमतीतील गंमत...

*

आठवणींच्या साठवणीतून

# आल्बम

-डॉ. सुमन नवलकर

(८)

आई आपल्या मुलांमधे भेदभाव करत नाही. पण वडील मात्र करत असावेत. नाहीतर दादांनी सर्वात जास्त प्रेम माझ्यावर केलं नसतं. तशी मी काही त्यांच्या तीन मुलांमधे सर्वात जास्त गुणी नव्हते. मोठा अत्यंत नम्र आणि मनमिळाऊ होता. धाकटा अत्यंत तीव्र बुद्धिमत्तेचा. मी ना नम्र होते, ना तीव्र बुद्धीमती. पण दादांची सर्वात लाडकी मी होते. नाहीतर टपाल- तिकिटांचे आल्बम बनवताना, मी मागीन-मागीन ती सर्व तिकिटं त्यांनी मला दिली नसती. धाकटा खूपच लहान होता. पण आम्हा दोघांना दादांनी दोन आल्बम करून दिले होते. फोर्टमधल्या त्यांच्या ऑफिसमधून येताना ते आमच्यासाठी निरनिराळ्या देशांची टपाल-तिकिटं विकत आणत. भारतीय तिकिटांची 'फर्स्ट डे कव्हर्स' जीपीओमधून घेऊन येत. (ज्यादिवशी ते तिकीट निघायचं, त्याच दिवशी ते फर्स्ट डे कव्हर निघायचं. कागदी पाकिटावर त्या तिकिटासंबंधीची सचित्र माहिती छापलेली असायची.) तिकिटं आणि फर्स्ट डे कव्हर्स गोळा करण्याचा दादांचा छंद आमच्या दोघांच्या रूपात त्यांनी जोपासला होता. देशी-विदेशी टपालतिकिटं आणून, त्यांची विभागणी करून ते आमच्या आल्बममधे आम्हाला चिकटवायला शिकवत. राजे, राण्या, इतर महत्त्वाच्या गोष्टी या तिकिटांमधे चित्रित केलेल्या असत. काही-काही तिकिटं तर त्रिकोनी, चौरस आणि भली-मोठीही असत. दादा विभागणी करायला लागले, की मी छान-छान तिकिटं स्वत:साठी मागून घेत असे. अर्थात् भाईपेक्षा माझा आल्बम अधिक सुंदर होता. आल्बम म्हणजे एक फाईलच होती. हवे तितके कागद वाढवता येतील अशी फाईल. गुलाबी रंगाची फाईल आणि आत पांढऱ्या कागदांवर चिकटवलेली तिकिटं. तिकिटं आणली की दादा त्याना थोडा वेळ पाण्यात ठेवायचे. मग अलगद त्यांच्या मागच्या बाजूला असलेला कागद सोडवायचे. मग तिकिटं सुकायसाठी कापडावर पसरली जायची. पूर्ण वाळल्यावर 'हिंजेस' नावाचे, एका बाजूने चिकट असलेले पारदर्शक कागदाचे तुकडे अर्धवट घडी घालून,जरासे ओलसर करून तिकिटाना मागच्या बाजूला चिकटवले जायचे. फाईलमधे कागदावर त्या पारदर्शक 'हिंज'चा दुसरा भाग ओलसर करून चिकटवला जायचा. हे सगळं इतक्या अलगदपणे केलं जायचं, की तिकीट खराब होऊ नये हा हेतू.

तर इतका सुंदर आल्बम म्हटल्यावर वर्गमैत्रिणींना दाखवायची, त्यांच्याकडून स्तुती ऐकायची इच्छा होणारच ना? तसंच झालं. मी आल्बम घेऊन शाळेत गेले. मधल्यासुट्टीत तो मैत्रिणींना दाखवला. इतका आगळा-वेगळा छंद म्हटल्यावर कौतुकाला पात्र असणारच ना? मधल्यासुट्टीनंतरची बेल वाजल्यावर मी आल्बम दप्तरात ठेवला आणि नंतरचे तीन-चार विषयांचे तास झाल्यावर वह्या-पुस्तकं दप्तरात ठेवून, दप्तराचे बंद लावून घरीही आले. 'शाळेत आल्बम न्यायचा नाही,' हा नियम असल्यामुळे घरी आल्यावर आल्बम पुन्हा जागच्याजागी कपाटात ठेवायसाठी दप्तर उघडलं. आल्बम नव्हताच. त्यामुळे आल्बम शाळेत गुपचुप नेला होता ते आपोआप उघडकीला आलंच. खूप रडले. उघड-उघड रडले. आतल्या आत रडले. दुसऱ्या दिवशी शाळेत गेल्यावर मैत्रिणींकडे चौकशी केली. बाकांमधे शोधण्यात काहीच अर्थ नव्हता. कारण त्याच वर्गांमधे दुपारी मुलांची शाळा भरायची. आल्बम सापडला नाहीच.

स्वार्थीपणे स्वत:ला छान-छान तिकिटं मागून घेऊन चिकटवलेला आल्बम कोणीतरी माझ्या दप्तरातून चोरला होता.

बारा-तेरा वर्षांची असताना मनावर झालेला तो आघात अजूनही तितकाच खोल आहे. जखम तशीच भळभळती आहे. आपल्याला आवडलेली दुसऱ्याची वस्तू, तीही इतक्या मेहनतीने, कलात्मकतेने आणि प्रेमाने बनवलेली वस्तू आपलीच असल्यासारखी स्वत:च्या दप्तरात टाकताना त्या मुलीला काहीच कसं वाटलं नसेल? मला हा प्रश्न अजूनही वारंवार पडतो.

खरं तर 'नको' सांगितलं असतानाही गुपचूप आल्बम शाळेत मैत्रिणीना दाखवायला घेऊन जायची भली मोठी चूक मी केली होती. दादांचे पैसे आणि मेहनत दोन्ही वाया गेली होती. पण त्या शांत आणि प्रेमळ माणसाने मला चापटी मारणं तर दूरचीच गोष्ट, रागाचा एक शब्दही उच्चारला नाही. आई शिस्तीची आणि थोडी तापटही होती. पण तीही गप्प राहिली. मला जास्त दु:ख झालं ते त्यामुळेच.

दादांनी नंतर पुन्हा माझ्यासाठी नवा आल्बम कधी बनवायला घेतला, ठाऊक नाही. पण तो मला न देता आपल्या नातवाला त्याच्या एका वाढदिवसाला दादांनी दिला. मी पोस्टाची अनेक सुरेख तिकिटं नंतरच्या काळात गोळा केली. दादा करायचे तशी सर्व प्रक्रिया करून ती त्या आल्बममधे चिकटवलीही. तो आल्बम कपाटात अजूनही आहे. पण माझ्या बालपणी चोरला गेलेला तो मौल्यवान आल्बम, त्याची पैशात किंमत तर होतीच; पण भावनिक किंमत कितीतरी अधिक असलेला तो आल्बम- त्या आल्बमचोर मुलीने सांभाळून ठेवला असेल का? की केलं असेल त्याला मातीमोल कधीच? कोण जाणे!

मो.८७७९९१९४०४

✳

(पान ३ कॉलम ४ वरून)

त्या ''ना मैं टायर्ड हूँ, ना रिटायर्ड हूँ, मैं तो केवल फायर हूँ'' या माननीय श्री शरदचंद्रजी पवार यांच्या उक्तीप्रमाणे आपल्या मनाच्या श्रीमंतीचे दर्शन त्यांच्या वैचारिक लेखातून दर्शवत असतात. या प्रभुतरुणाच्या शंभराव्या वाढदिवसानिमित्त मी सर्वप्रथम या अस्मादिक संपादिकेचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

आता प्रश्न असा पडतो की प्रभुतरुणाने खरोखरच आपल्यासारख्या वाचकांना काय दिले? म्हणतात ना; काही गोष्टी आपल्यावर कळत नकळत संस्कार करत असतात. तसेच प्रभुतरुण वाचताना आपल्या मनावर कळत नकळत वैचारिक संस्कार होतच राहतात. प्रभुतरुणाचे संपादकीय दर महिन्याला काळानुरूप आपले सण, रितीरिवाज इतिहास इ. विषयांची सुसंगत माहिती देते तर कधीकधी एका विनोदी छटेने आपले मनापासून मनोरंजनही करते. इतकेच काय तर जनन-मरण, आत्याबाई नाव बोला, नारळ साखर दिला, विवाह, व्रतबंध इत्यादी शीर्षकाखाली आपल्या ज्ञातीतील बंधूभगिनींबाबत पूर्ण माहिती आपणांस मिळते. या व्यतिरिक्त आपल्या ज्ञातीतील काही लेखक, लेखिका, कवी-कवयित्री यांचे लेख कविताही फारच उद्बोधक असतात.

खरोखरच हा प्रभुतरुण आपल्या पाठारे प्रभु ज्ञातीचा एक विश्वसनीय आधार आहे असेच म्हणावे लागेल. आपली पाठारे प्रभु ज्ञात आपापल्या व्यवसायात, नोकरीत, धंद्यात चांगलीच स्थिरावली आहे. अनेक उच्च पदांवर पाठारे प्रभु मानाची पदे मिरवत आहेत. अशा कर्तृत्ववान प्रभुंचे कौतुक प्रभुतरुण अतिशय हौसेने करत असते. अशा ज्ञाती बंधु भगिनींच्या पाठीवर जेव्हा प्रभु तरुणाच्या माध्यमातून कौतुकाची थाप पडते तेव्हा त्या प्रभुंचा उर अभिमान व समाधानाने भरून येतो. मी तर म्हणेन; माझ्यासारख्या भाईंदर स्थित पाठारे प्रभुंना प्रभुतरुणाने लेखनाची संधी दिली. त्याबद्दल मी प्रभुतरुणाचा आणि विशेषकरून संपादिका श्रीमती सुहासिनी कीर्तिकरांचा ऋणी आहे.

हा प्रभुतरुणाचा 'कस्तुरी सुगंध' असाच संपूर्ण ज्ञातीभर दरवळत राहो आणि येणाऱ्या भविष्यात प्रभु तरुणाची वाटचाल द्विशतकाकडे अशीच दिमाखदार होवो ही ईश्वरचरणी प्रार्थना मी करतो.

धन्यवाद!

मो. ९८२१६०७५९३

✳

## सोशल समाजाची अभंगयात्रा

कोरोनाच्या साथीमुळे खंडित झालेला व ऑनलाईन पद्धतीने साजरा होणारा सोशल समाजाचा अभंगयात्रेचा कार्यक्रम यंदा १ जुलै २०२३ रोजी पा. प्र. चॅरिटीजच्या चर्नीरोडच्या व्यंकटेश मंदिरात अतिशय उत्साहात साजरा झाला. प्रारंभी समाजातर्फे व्यंकटेशाला हार, नारळ आणि पेढ्याचा प्रसाद अर्पण केल्यावर समाजाचे सं. चिटणीस जयंत कीर्तिकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. विश्वस्त यतिन व्यवहारकरांनी मनोगत व्यक्त केले. नंतर कार्यक्रमाची सूत्रे समाजाध्यक्षा श्रीमती स्वाती राणे यांनी हाती घेतली. त्यांचे निवेदन नेहमीप्रमाणेच उत्कृष्ट झाले. एकूण लहानथोर २४ कलाकारांनी यात सहभाग घेतला. विवान आगासकर या बालकाच्या गणेशस्तवनाने अभंगयात्रेचा प्रारंभ झाला आरि भैरवीने सांगता झाली. कलाकारांमध्ये डॉ. हर्षद विजयकर, सौ. आसावरी धुरंधर, सौ. वर्षा धुरंधर, सौ. रश्मी व्यवहारकर, सौ. रॉनिका विजयकर, सौ. सीमा कीर्तिकर, श्रीमती क्षमा कोठारे आणि श्री. विद्युत नायक यांची गाणी विशेष रंगली. हार्मोनियमची साथ श्री. वसंत मोरे यांची होती तर तबल्याची साथ श्री. अवधूत चौबळ व श्री. शेखर नेरूरकर यांची होती. साईड ऱ्हिदम श्री. मधाळकर यांचा होता. उपस्थितांना समाजातर्फे पेढ्यांचा प्रसाद व कॉफी देण्यात आली. कार्यक्रमाच्या तालमीसाठी श्री. प्रदीप राणे आणि श्रीमती स्वाती राणे यांनी विशेष परिश्रम घेतले. सोशल समाजाच्या इतिहासात अखंडितपणे चालू राहिलेल्या अभंग यात्रेच्या प्रत्यक्ष कार्यक्रमात खंड पडल्याची खंत कलाकारांना व श्रोत्यांनाही होताच, पण साक्षात् पांडुरंगालासुद्धा ती जाणवली असेल. म्हणून यावर्षी हा सोहळा अतीव उत्साहात आणि उपस्थितांच्या लक्षणीय संख्येत साजरा झाला.

✳

# अभिमानास्पद



**Advocate Unnati Dhurandhar**

Its often said that Corporate Lawyers make lot of moollah, but we rarely come to know about their role as social activists and as professionals who go beyond the call of their duty in the field Public Welfare...Very recently I came to know about the role played by one such Mumbai based Lawyer in the field of Public Welfare through the channel of an Internationally acclaimed Lions Club Network. She is none other than a fellow Pathare Prabhu from Mumbai. Her name is Advocate Unnati Dhurandhar.

Born and brought up in Mumbai, educated in Mumbai and London as a Lawyer. Practiced law in Mumbai, London, Toronto and Dubai. Unnati has done it all in the field of law...but what really amazes me is the wide range of Social Service initiatives which are spearheaded by Unnati with the Lions Club Network in Mumbai, World Vision International and Oxfam.

She has done numerous check dam projects to answer the water woes of many Adivasi villages in Thane and Palghar Districts. She has done commendable work for the girl child education of zilla parishad school children. She has been instrumental in several projects to make rural areas open defecation free. She has been championing the cause of clean drinking water by the installation of Ultra Water filtration plants. The several social areas where she has contributed significantly have been, donation of dialysis machines, cataract surgeries, pediatric cancer, distribution of monthly ration, livelihood generation for women by distribution of sewing machines etc.

In her philanthropic career spanning two and a half decades she has donated over USD 23,500/- (Equivalent INR 19,27,000/-)

She has received several awards for her philanthropic works including the prestigious Melvin Jones Fellow from Lions International, District Governor's Recognition Award, Best 1st Vice President at the Multiple Districts of Lions International and most recently she has been the recipient of the Certificate of Appreciation from the Lions International President – Brian Sheean.

Our society needs worthy torch bearers for various social causes, and we are happy to know that Unnati has dedicated her time, energies, talent and monetary resources to bridge the gap between the haves and the have nots. Her commendable efforts focusing on the alleviation of global poverty are definitely noteworthy. Our best wishes to her noble endeavors in her crusade towards ending the injustice caused due to poverty.

✳

## पाठारे प्रभु सोशल समाज

दि. ११/०७/२०२३

**वार्षिक सर्वसाधारण सभेची अधिसूचना**

माननीय सभासद,

सा.न.वि.वि.

पाठारे प्रभु सोशल समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा व पंचवार्षिक निवडणूक रविवार दि. २७ ऑगस्ट २०२३ : रोजी पाठारे प्रभु को. ऑ. हौ. सोसायटीच्या सांस्कृतिक केन्द्राच्या सभागृहात गायत्री मंदिराशेजारी, प्रभु नगर, १२ वा रस्ता, खार (पू.) मुंबई - ४०००५२. येथे दुपारी ४ वाजता घेण्यात येईल. सर्व सभासदांनी उपस्थित रहावे ही विनंती!

**सभेपुढील कामकाज**

१) सूचना परिपत्रकाचे वचन
२) समाजाच्या रविवार दि. ११ सप्टेंबर २०२२ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेची टिपणे वाचून मंजूर करणे.
३) समाजाचा १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ सालाचा कार्यवृत्तांत अहवाल वाचून मंजूर करून घेणे.
४) समाजाच्या कार्यकारिणीचा १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ सालाचा जमाखर्चाचा ताळेबंद सादर करणे व मंजूर करून घेणे.
५) लेखा परीक्षकाची २०२३-२०२४ सालासाठी नियुक्ती करणे.
६) नवीन कार्यकारी समितीची निवडणूक घेणे आणि निकाल जाहीर करणे.
७) अध्यक्षांच्या परवानगीने आपल्या वेळेचे कामकाज.

विशेष सूचना : १) गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास तीच सभा त्याच ठिकाणी, त्याच दिवशी आधी ठरलेल्या वेळेच्या अर्ध्या तासानंतर (म्हणजे ४.३० वा.) घेण्यात येईल. त्यावेळी गणसंख्येचे बंधन राहणार नाही. २) समाजाचा अहवाल व जमाखर्चाचा ताळेबंद याविषयी ज्या सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी ते लेखी स्वरूपात समाजाचे सं. चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर, चंद्रकला, ३रा मजला, डिलीवरी पोस्ट ऑफीससमोर, ७ वा रस्ता, खार (प.), मुंबई - ४०००५२. येथे शनिवार दि. १९ ऑगस्ट २०२३ पर्यंत पाठवावेत.

आपले नम्र,
सौ. नीता मिलिंद सेंजित (९८२०१६६६२८)
श्री. जयंत बाळकृष्ण कीर्तिकर (९८६७९५८५३५)
सं. चिटणीस

(पान २ कॉलम ४ वरून)

तळलेला तुकडादेखील नैवेद्यामधे ठेवला जातो.

हिंदुबांधवांचे सगळेच सण पर्यावरणाशी आणि निसर्गाशी निगडीत असल्याचे या सणांची माहिती घेतल्यावर आपल्या लगेच लक्षात येते. निसर्ग हा माणसाकरता सतत सकारात्मक राहावा त्याची कायम आपल्यावर छत्रछाया राहावी म्हणून हे सण, उत्सव, मनुष्य कायम परंपरेने पाळत आलेला आहे.

**रक्षाबंधन**

रक्षाबंधनाचा सण शतकानुशतके आधीपासून सुरू झाल्याचे ज्ञात आहे आणि या विशेष सणाच्या उत्सवाशी संबंधित अनेक कथा आहेत.

हा एक लोकप्रिय आणि पारंपारिकपणे हिंदू वार्षिक संस्कार किंवा समारंभ आहे जो भारतीय उपखंडात साजरा केल्या जाणाऱ्या त्याच नावाच्या सणाचा केंद्रबिंदूआहे. हिंदू संस्कृतीचा प्रभाव असलेल्या जगाच्या इतर भागातही तो साजरा केला जातो. ह्या प्रसंगी स्त्री आणि पुरुष यांच्यातील भाऊ-बहिणीचे नाते साजरे करण्यासाठी बहीण आपल्या भावाच्या मनगटाभोवती राखी बांधते आणि त्याच्या समृद्धी, आरोग्य आणि कल्याणासाठी प्रार्थना करते. ह्या नात्यातील स्त्री व पुरुष सख्खी भावंडे असणे जरुरीचे नाही. एक पवित्र असे भावाबहिणीचे नाते ज्या पुरुषाच्या व स्त्रीच्यामध्ये निर्माण होते, ते हा सण आनंदाने साजरा करतात.

या दिवशी, एक बहीण आपल्या भावाच्या मनगटाभोवती राखी बांधते आणि त्याच्या समृद्धी, आरोग्य आणि कल्याणासाठी प्रार्थना करते. त्या बदल्यात भाऊ भेटवस्तू देतो आणि आपल्या बहिणीला कोणत्याही हानीपासून आणि प्रत्येक परिस्थितीत संरक्षण देण्याचे वचन देतो. दूरच्या कुटुंबातील सदस्य, नातेवाईक किंवा चुलत भाऊ-बहीण यांच्यातही हा सण साजरा केलाजातो.

हिंदू पुराणाशी संबंधित अशा काही कथा खालीलप्रमाणे आहेत.

इंद्रदेव आणि शची-भविष्य पुराणातील प्राचीन आख्यायिकेनुसार, एकदा देव आणि दानवांमध्ये भयंकर युद्ध झाले. भगवान इंद्र व आकाश, पाऊस आणि मेघगर्जना यांच्या मुख्यदेवता, जे देवांच्या बाजूने युद्ध लढत होते, त्यांना बलवान व सत्वशील राक्षसराजा, बली यांच्याकडून कठोर प्रतिकार होत होता. युद्ध बराच काळ चालू राहिले तरी निर्णायक घडी समाप्ती झाली नाही हे पाहून इंद्राची पत्नी शची भगवान विष्णूंकडे गेली, त्यांनी तिला सुतीधाग्याने बनवलेले पवित्र कंकण दिले. शचीने तिचा पती, भगवान इंद्र यांच्या मनगटाभोवती हा पवित्र धागा बांधला ज्याने शेवटी राक्षसांचा पराभव केला आणि अमरावती परत मिळवली. सणाच्या पूर्वीच्या अहवालात या पवित्र धाग्यांना ताबीज असे म्हणत जे स्त्रिया प्रार्थनेसाठी वापरत असत आणि जेव्हा पती युद्धासाठी निघत तेव्हा त्यांच्या हाताला बांधत. सध्याच्या काळाच्या विपरीत, ते पवित्र धागे केवळ भाऊ-बहिणीच्या नात्यापुरते मर्यादित नव्हते.

**राजाबली आणि देवीलक्ष्मी -**

भागवत पुराण आणि विष्णुपुराणातील एका आख्यायिकेनुसार, जेव्हा भगवान विष्णूने राक्षसराजा बलीपासून तिन्ही लोक जिंकले, तेव्हा त्याने विष्णूला राजवाड्यात आपल्या शेजारी राहण्यास सांगितले. ही विनंती मान्य करून विष्णू तेथे राहू लागला. तथापि, भगवान विष्णूची पत्नीदेवी लक्ष्मीला वैकुंठाला परतायचे होते. म्हणून, तिने राक्षसराजा बलीच्या मनगटावर राखी बांधली आणि त्याला भाऊ बनवले. परतीच्या भेटवस्तूबद्दल विचारल्यावर, देवी लक्ष्मीने बलीला आपल्या पतीला व्रतातून मुक्त करून वैकुंठाला परत जाण्यास सांगितले. बलीने विनंती मान्य केली आणि भगवान विष्णू आपली पत्नी देवी लक्ष्मीसह आपल्या ठिकाणी परतले.

(क्रमशः)

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### बाळा जो जो रे

२६-७-२३ सौ. कस्तुरी आणि श्री. लोकेश चंद्रशेखर धैर्यवान, पुत्र, अमेरिका

### आत्याबाई नाव बोला

७-७-२३ रिषीव तन्मय प्रदीप विजयकर, वांद्रे

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ३०-६-२३ | श्रीम. मीनाक्षी विठ्ठल नारायण नवलकर, | वय ८२, | सांताक्रूझ |
| ०१-७-२३ | श्री. बालम् मनोहर त्रिलोकेकर, | वय ५९, | आळंदी |
| १३-७-२३ | श्री रंजन कमलाक्ष खंडेराव कोठारे, | वय ७१, | अंधेरी |
| १४-७-२३ | श्री विनायक केशवराव तळपदे, | वय , | अंधेरी |
| १४-७-२३ | सौ. संयुक्ता किरण धैर्यवान, | वय ६६, | कोंढवा, पुणे |
| १५-७-२३ | श्रीमती सरोज (जेनी) अंबर कोठारे, | वय ९३, | कांदिवली |
| १८-७-२३ | सौ. पन्ना मिलिंद कोठारे, | वय ७२, | माहिम |
| २०-७-२३ | सौ मनिषा डी शर्मा, (पूर्वाश्रमीच्या कु. मनिषा सतीश शामराव कोठारे) | वय ६२, | मालाड |
| २३-७-२३ | श्रीमती सुहासिनी सुहास कोठारे | वय ७९, | जोगेश्वरी |

## प्रभुतरुणास देणगी

∗ कै. सुंदर विनायक नवलकर यांजकडून (त्यांच्या इच्छापत्रानुसारे) कै. कु. मालती विनायक नवलकर यांच्या स्मरणार्थ प्रभुतरुणास देणगी रु. १०,०००/-

∗ कै. सुंदर विनायक नवलकर यांजकडून (त्यांच्या इच्छेनुसार) कै. मुकुंद विनायक नवलकर यांच्या स्मरणार्थ ज्ञातीतील गुणवंत कलाकारास एकदाच गौरविण्यासाठी रू. ७,०००/-

वरील देणग्यांचा तपशील कै. सुंदरताईंच्या इच्छापत्राची अंमलबजावणी करणा-या तेजवंत नवलकर यांनी कार्यवाही करून अंमलात आणला. त्यांचे आभार.

## अभिनंदन

∗ 'महाराष्ट्र टाइम्स'च्या 'मटा कल्चर क्लब'तर्फे झालेल्या कॅलिडोस्कोप कला सांस्कृतिक महोत्सवांतर्गत 'चला नाटक समजून घेऊ' हा ठाण्यात कार्यक्रम झाला. ३० जून रोजी या कार्यक्रमात शिल्पा नवलकर यांच्या 'सेल्फी' नाटकाचे अभिवाचन सादर झाले. 'बाईपण भारी देवा' या चित्रपटातही त्यांची लक्षणीय भूमिका आहे.

∗ 'प्रभुतरुण' बुलेटिनला यावेळी पाचशेच्यावर भरघोस प्रतिसाद मिळाला.

∗ 'झी मराठी' वरील 'किचन कलाकार' कार्यक्रमात आदिनाथ कोठारे यांचा सहभाग होता; तर 'कीचनक्वीन' कार्यक्रमात कल्पना तळपदे परीक्षकाच्या भूमिकेत होत्या.

∗ आर्किटेक्चर श्री. संकेत अनिल जयकर यांना इण्डेक्स एक्सलन्स डिझाइन अवॉर्ड आयएफजी तर्फे देण्यात आले.

∗ १२ जुलै रोजी नॅशनल लायब्ररी, वांद्रे इथे बालकाव्य संमेलन घेण्यात आले. त्यात डॉ. सुमन नवलकर यांचा सहभाग होता.

∗ 'चांद्रयान ३' या मोहिमेची वैशिष्टये सांगणारा दृकश्राव्य कार्यक्रम १३ जुलै रोजी मो. ह. विद्यालय, ठाणे येथे सादर झाला. त्यातील एक सादरकर्त्या होत्या खगोल अभ्यासक डॉ. विनिता नवलकर. त्यांचे डी. डी. सह्याद्री वाहिनीवर प्रात्यक्षिकासहित सादरी-करणही झाले. या ऐतिहासिक मोहिमेत त्यांचा सहभाग होता.

∗ डॉ. मंगला नारळीकर यांच्या निधनानंतर १८ जुलैच्या लोकसत्तेत वाचकपत्रात मृदुला प्रभुराम जोशी यांनी त्यांच्या आठवणी जागवल्या.

∗ दिनांक २३-७-२३ रोजीच्या महाराष्ट्र टाइम्समध्ये आमचे सदरलेखक श्री नंदकुमार विजयकर यांच्या मासलेवाईक माणसे या पुस्तकावर परीक्षण प्रसिद्ध झाले.

∗ सॉलि. राजन जयकर यांनी एन् जी एम् ए तर्फे झालेल्या 'पुरातन वस्तू-संग्रह' या चर्चासत्रात आपल्याकडील काही संग्रहित चीजा दाखवून भाषण केले.

सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन.

## पाठारे प्रभु चॅरिटीज

चॅरिटीजचा वार्षिक अहवाल घरोघरी प्राप्त झाला. आर्थिक हिशोब, चॅरिटीजचे उपक्रम, सभेची सूचना इत्यादींबरोबर अजित मोरोबा विजयकरांनी वीरपाल राणेंवर लेख लिहिला आहे. राजन वामनराव जयकरांनीही वीरपालांवर लेख लिहिला आहे. वीरपालांच्या फोटोसह या अहवालात त्यांना स्थान मिळणे औचित्यपूर्ण.

## पाठारे प्रभु महिला समाज

संस्थेचा नेटकेपणाने सादर केलेला वार्षिक अहवाल सदस्यांना घरोघरी प्राप्त झाला. यातही आर्थिक हिशोब, पुढील सभेची सूचना, होणाऱ्या स्पर्धांची माहिती, दिवंगतांची नोंद आणि वर्षभरात घेतलेल्या कार्यक्रमांचा तपशील आहे.

## परीक्षेतील सुयश

**पीजीडीएम् (एमबीए पदवी)**
**एमआयटी - डब्ल्यू, पुणे**
कु. सानिका पिनाकी जयकर, द्वितीय क्रमांक

**एम बी ए (डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणे)**
श्री. राहुल बालम त्रिलोकेकर आणि इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (एमबीए मधील प्रमुख विषय) मध्ये प्रथम क्रमांक प्राप्त. ९५.५८ टक्के

**बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग (इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी)**
कु. लीना नील कीर्तिकर ९.२८/१०

## प्रतिक्रिया

बुलेटीन पाठविल्याबद्दल धन्यवाद! खूपच छान वाटते. अनुजा अजिंक्यची बातम्या देण्याची धाटणी अप्रतिम आहे.

-वृंदा जयकर

## भावांजली

श्रीमती सरोज अंबर कोठारे पाठारे प्रभू महिला समाजाच्या माजी अध्यक्षा होत्या. नंतर विश्वस्तपदही त्यांनी भूषविले. त्यांनी अनेक मराठी नाटकांतून भूमिका केल्या होत्या. सरोज या नावाचे त्यांच्या मावस बहिणीने कौतुकाने जेनमा असे नामकरण केले. पती अंबर कोठारेंसह काम करताना 'जेनमा फिल्म्स' ही संस्था निर्माण झाली. संस्थेच्या या शिक्क्याला चित्रपटसृष्टीत यशस्वी, ऐतिहासिक स्थान प्राप्त झाले. यशस्वी चित्रपट, मालिका निर्माण करताना पती अंबर, पुत्र महेश आणि नंतर नातू आदिनाथ कोठारे यांनी आपल्या दिग्दर्शन, अभिनयाच्या मुद्रा उमटविल्या. स्वभावाने अत्यंत लाघवी अशा 'जैनी' म्हणजेच सरोज यांना प्रभुतरुणातर्फे भावांजली.

## प्रतिक्रिया

Digital Prabhu Tarun was brilliant idea. You need talent and patience both to keep it rolling as it's thankless job. But "creators" should not bother of it. Job by ur team is highly appreciated. My best wishes to you all. So pleased to see my friend Chhona's daughter's active involvement from US. You are most welcome. I'm just a call away. God bless.

-Sunil Jayakar

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67